PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Asla Navra Nako Ga Bai
Year: 1977

Song: Tinavar Saha
Lyricist:

तीन सहा
तीन सहा
म्हणजे तीनावर सहा
तीनावर सहा

तीनावर सहा
तीनावर सहा
छत्तीस आकडा हाय लय वाकडा रं
तीनावर सहा
छत्तीस आकडा हाय लय वाकडा रं
वाकड्यात शिरतो न् आकड्यात धरतो
गडी मी फाकडा रं
तीनावर सहा
घावला रं घावला नंबर घावला
छत्तीस छत्तीस पक्क्या लावला
ए...घावला रं घावला नंबर घावला
छत्तीस छत्तीस पक्क्या लावला
छत्तीस नव्हं ह्यो तिरसट हाय
उलट नि सुलट कळत नाय
अरं रं रं रं रं रं....
असा कसा ह्यो घोटाळा घडला
छत्तीस नंबरी कुठं दडला
गोरा गोरा मुखडा रं
गोरा गोरा मुखडा रं
तीनावर सहा

आली रं आली चालून आली
छत्तीस छत्तीस नखरेवाली...
अरे आली रं आली चालून आली
छत्तीस छत्तीस नखरेवाली...
ही तर आली तेरा तेरा
या या गबरूचं वाजलं बारा
अरं रं रं रं रं रा
अरे माझा शानपना मलाच नडला
छत्तीस नंबरी कुठं दडला
गोरा गोरा मुखडा रं
गोरा गोरा मुखडा रं
तीनावर सहा

छत्तीस छत्तीस घोकम पट्टी
तुझ्यासंगं मी जमविन गट्टी
हे... छत्तीस छत्तीस घोकम पट्टी
तुझ्यासंगं मी जमविन गट्टी
टुरींग नव्हं ह्यो टरक हाय
बाई न बापई फरक हाय
अरं रं रं रं रं रा
आता डोळ्यावरचा इसवास उडला
छत्तीस नंबरी कुठं दडला
गोरा गोरा मुखडा रं
गोरा गोरा मुखडा रं
तीनावर सहा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*